## महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम)
## अल्पसंख्यांक महिला सक्षमीकरणकार्यक्रम (MWEP)

**अल्पसंख्यांक कार्यक्रमाची पार्श्वभूमीः-**

अल्पसंख्यांक घटकांतील महिलांचा विकास साधणे व त्यांना विकासाच्या मूळ प्रवाहामध्ये सामावून घेण्याच्या दृष्टीने अल्पसंख्यांक विकास विभागा (मंत्रालय- मुंबई) च्या पुढाकाराने अल्पसंख्यांक महिला सक्षमीकरण कार्यक्रमाची सुरूवात झाली आहे. महिला सक्षमीकरणासाठी " स्वयंसहाय बचत गट" हे एक सशक्त माध्यम असल्याचे आतापर्यंतच्या कामातून लक्षात आले आहे. ही बाब लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने स्वयंसहाय्यता बचत गटावर आधारित प्रायोगिक तत्वावरील कार्यक्रम पहिल्या टप्प्यात सन2006-07 या वर्षात मुंबई शहरातील अल्पसंख्यांक बहुल कार्यक्षेत्रात राबविण्याचा निर्णय घेतला.

महिला सक्षमीकरण स्वयंसहाय्यता बचत गटातील माविमची तज्ञता लक्षात घेऊन या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याची जवाबदारी माविमकडे देण्यात आली. माविमने हा प्रायोगिक कार्यक्रम मुंबई जिल्हयात राबविला. या कार्यक्रमाच्या अनुभवानंतर महाराष्ट्र राज्य शासनाच्या अल्पसंख्यांक विकास विभागाने हा कार्यक्रम केंद्र शासनाने घोषित केलेल्या राज्यातील 45 जिल्हयातील 43 अल्पसंख्यांक बहुल कार्यक्षेत्रात राबविण्याची घोषणा केली. त्यातील पहिल्या टप्प्यात 10 जिल्हयातील 13 अल्पसंख्यांक बहुल कार्यक्षेत्रात 2600 बचत गटांची निर्मिती करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने, शासन निर्णय.क्र.अ.वि.वि.सन 2009/प्र.क्र.14/का-9, मंत्रालय मुंबई. दि. 28 फेब्रु 2011-12 नूसार घेण्यात आला.

**अल्पसंख्यांक महिला सक्षमीकरण कार्यक्रमाची गरज**

राज्यातील अल्पसंख्यांक बहुल क्षेत्रात वास्तव्यास असलेल्या अल्पसंख्यांक लोकसमुहातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी त्यांना बचत गटांच्या माध्यमाद्वारे संघटीत करून पुरेसा पतपुरवठा उपलब्ध करून देणे व त्यांना उद्योजकतेविषयी आवश्यक असेलेली माहिती उपलब्ध करून देऊन त्यांच्यामध्ये उद्योजकीय कौशल्य विकसित करण्याच्या हेतूने अल्पसंख्यांक महिला स्वयंसहाय्यता बचत गट स्थापन करण्यात येत आहेत. अल्पसंख्यांक समूहातील महिलांना सामाजिक व आर्थिक विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणेच्या हेतूने “अल्पसंख्यांक महिला सक्षमीकरण कार्यक्रमाची” निर्मिती करण्यात आली आहे.

अल्पसंख्यांक महिलांना रूढी व परंपरा यांच्या धनातून मुक्त करून त्यांच्या क्षमता विकसित करणे, त्यांचा निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढविणे आवश्यक आहे, महिला आर्थिक विकास महामंडळ सर्व स्थरातील गरीब, गरजू,

विधवा, परीतक्ता या सामाजिक सामाजिक दृष्ट्या दुर्लक्षित घटकातील महिलांना  केंद्रस्थानी ठेऊन त्यांचा व त्यांच्या कुटुंबाचा  सर्वांगीण विकास घडविण्यासाठी कार्यरत आहे.

**कार्यक्रमाचे ध्येय :-**

ध्येय :- अल्पसंख्यांक महिलांच्या स्थायी विकासाकरीता स्वयंसहाय्यता बचत गटांची संस्थात्मक बाधंणी करून त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहामध्ये सहभागी करून घेऊन त्यांचा सामाजिक आर्थिक विकास करुन त्यांना सक्षम करणे.

**कार्यक्रमाचे उद्दिष्टे  :-**

- अल्पसंख्यांक घटकांतील योग्य निकषातील लाभार्थींच्या  बचत गटांची निर्मिती करणे.
- बचत गटाला लघुपत पुरवठा व विमाच्या सेवा उपलब्ध करून देणे
- गटातील महिला व परिसरातील लाभार्थींना उपजीवीकेबाबतच्या नवीन आणि सद्‌यस्थितीतील अस्तित्वात असलेल्या उदयोग / व्यवसायांना वृध्दींगत करणे
- महिलांचे आरोग्यमान उंचवणे, सकस आहार, स्वच्छता, महिलांचे काबाडकष्ट, अन्न सुरक्षा, कायदेविषयक जाणीव जागृती घडवून आणणे.
- युवकांचे संघटन सक्रिय करणे, त्यांच्या महिलांच्या कार्यक्रमाच्या प्रती जाणीव जागृती घडवून आणणे

| | |
|---|---|
| कार्यक्रम निधी | २७.५४ कोटी |
| कार्यक्रम कालावधी | ८ वर्ष (२०१९ पर्यंत) |
| कार्यक्रम कार्यक्षेत्र | १० जिल्हयातील १३ कार्यक्षेत्र |
| जिल्हे | मुंबई, ठाणे, नाशिक,पुणे, सांगली, औरंगाबाद, परभणी, नांदेड, वाशीम, नागपूर. |
| लाभार्थी | अल्पसंख्यांक समूहातील गरीब गरजू महिलां. |

**लक्ष्य घटक निवड :-**

मुस्लीम, बौध्द, जैन, ख्रिश्चन, पारसी  व शिख व अल्पसंख्यांक प्रवर्गातील गरीब व गरजू महिलांचा दारिद्रय रेषेखालील 80% महिला व 20 %  इतर समाज घटकातील गरीब व गरजू किंवा PRA-BPL  महिलांचा समावेश करण्यात येइल.

**अल्पसंख्यांक कार्यक्रमाचे मुख्य घटक :-**

1) संस्थात्मक बांधणी (Grassroots Institution Building(GIB))
2) उपजीवीका विकास व बाजारपेठ व्यवस्था - (Livelihood Development & Marketing )
3) सुक्ष्म पतपुरवठा सेवा - ( Micro Finance  Services - MFS)

4) महिलांसाठी आरोग्य सेवा व सामाजिक जाणीव जागृती ( women Health & Social Awareness
5) प्रकल्प व्यवस्थापन व अंमलबजावणी (Programme Management)

**कार्यक्रमाची रणनिती** - या कार्यक्रमाची एक प्रमुख रणनिती म्हणजे स्वयंसहाय्य बचत गटांच्या माध्यमातून महिलांना सक्षम करणे व त्यांची क्षमतावृध्दी करणे या रणनितीमध्ये वस्तीस्तरीय संस्थात्मक बांधणी करण्यात येणार असून यामध्ये संघटित स्वयंसहाय्यता बचत गट, वस्तीविकास समिती व लोकसंचलित साधन केंद्र (बचत गटांची संस्था) अशा आहे.

**संस्थात्मक बांधणी (Grassroots Institution Building(GIB))** -
अल्पसंख्यांक कार्यक्रमामध्ये अल्पसंख्यांक बहुल कार्यक्षेत्रात गरीब व गरजु, दारिद्रयरेषेखालील महिलांना बचत गटांच्या प्रक्रियेतून सहभागी करुन त्यांचे स्वयंसहाय्य बचत गट करणे. या प्रक्रियेवर भर देण्यात येणार आहे. या कार्यक्रमात २६०० बचत गटांची निर्मिती टप्याटप्याने करण्यात येणार आहे. २०० ते २५० बचत गट एका कार्यक्षेत्रात करण्यात येतील.

- **स्वयंसहाय्यता बचत गट (SHG )** – बचत गटांमध्ये (SHG) किमान 12 ते 15 व जास्तीत जास्त 20 महिलां सहभागी असतील. बचत गट हे प्राथमिक स्तरावरील संघटन आहे. अशा २०० बचत गटांची निर्मिती होईल.
- **वस्ती विकास समिती (CLC)** - एकाच नगरात, मोहल्लयामध्ये किमान १० ते १२ किंवा १५ स्वयंसहाय्यता बचत गटांचे एकत्र संघटन निर्माण करुन त्यांना वस्ती विकास समिती असे संबोधण्यात येईल. वस्ती विकास समिती हे संघटनात्मक बांधणीचा दुसरा टप्पा आहे. बचत गटांच्या विकासाच्या दृष्टिने कार्यरत राहील. एका (CMRC) केंद्रामध्ये १७ CLC स्थापन होतील.
- **लोक संचलित साधन केंद्र (CMRC)** - कार्यक्षेत्रामध्ये २०० ते २५० बचत गटांची एक सामुहिक (फेडरेशन) स्वायत्त संस्था म्हणून काम करणारी म्हणजेच लोकसंचलित साधन केंद्राची निर्मिती होईल. हा संस्थात्मक बांधणीचा तिसरा टप्पा असेल. ही लोक संचलित ही संस्था नोंदणी कायदया अंतर्गत नोंदणीकृत करण्यात येतील. महिलाच त्याचा कारभार पाहतील. त्यांना माविमचे मार्गदर्शन राहील. सर्व बचत गटातील सदस्य महिला लोकशाही प्रणालीप्रमाणे काम करतील प्रत्येक गटाचा व प्रत्येक महिलेचा सामाजिक, आर्थिक विकास घडवुन आणतील.

संस्थात्मक बांधणी घटकांमध्ये महिलेच्या क्षमतावृध्दी प्रशिक्षणावर प्रामुख्याने भर देण्यात आला आहे. यात 28478 महिलांपैकी 26070 महिलांना संकल्पना आणि लेखापुस्तिका प्रशिक्षण 7312 महिलांना, कार्यात्मक साक्षरता प्रशिक्षण 3600 महिलांना, जेंडरविषयक प्रशिक्षण 3680 महिलांना व अनुभव (भेट) प्रशिक्षणाद्वारे 4950 महिलांना विविध ठिकाणच्या बचत गटाद्वारे झालेल्या प्रगतीचा अनुभव देण्यात आला आहे. जिल्हयांमध्ये किमान एक ते दोन वस्तीविकास समित्यांची स्थापनेची संकल्पना स्पष्टता व उभारणीची प्रक्रिया सुरु झाली आहे.

| अ.क्र. | सिएमआरसी | बचत गट | महिला संख्या | बचत रु | कर्ज प्राप्त बचत गट | प्राप्त बँक कर्ज रक्कम रु |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Chandivali | 184 | 2268 | 10,60,300 | 19 | 950000 |
| 2 | Dharavi | 146 | 1559 | 1302913 | 19 | 12,10,000 |
| 3 | Trombay | 97 | 1164 | 454644 | 2 | 100000 |
| 4 | Mumbra | 111 | 1521 | 605540 | 35 | 1284000 |
| 5 | Bhiwandi | 176 | 2252 | 1061400 | 22 | 260800 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 6 | Pune | 173 | 2197 | 1318400 | 21 | 1608000 |
| 7 | Sangali | 218 | 2742 | 2727762 | 96 | 8618500 |
| 8 | Nashik | 169 | 1937 | 1817470 | 79 | 5194117 |
| 9 | A.Bad | 232 | 3163 | 4949100 | 134 | 11926950 |
| 10 | Parbhani | 233 | 2824 | 3795405 | 100 | 7054700 |
| 11 | Nanded | 203 | 2543 | 2456900 | 115 | 8093600 |
| 12 | Washim | 169 | 2054 | 1399115 | 36 | 2572100 |
| 13 | Nagpur | 181 | 2254 | 1225238 | 18 | 1010110 |
| | Total | 2292 | 28478 | 1,92,25,087 | 696 | 3,76,95,127 |

**सुक्ष्म लघुपतपुरवठा सेवा -**

गटात सामिल होणा-या महिला या सुरुवातीस बचतीच्या निमित्ताने एकत्र होतात. या बचतीला नियमबध्द करुन गटात होणा-या बचतीमधून अडचणीला अंतर्गत कर्ज देणे, अंतर्गत कर्जव्यवहार सुरळित करुन एकमेकांचा निश्वास वाढविणे. या अंतर्गत कर्जातून छोटया छोटया घरगुती कर्जाच्या गरजा भागविणे. पुढे जाऊन बँकेकडून कर्ज घेऊन आर्थिक उत्पन्न मिळविण्यासाठी उदयोगव्यवसाय निर्माण करणे. या बाबींवर लक्ष दिले जाते.

**सुक्ष्म लघुपतपुरवठा घटकातील साध्यः**

अल्पसंख्यांक कार्यक्रमाला सन 2012-13 व 2013-14 या दोन वर्षात प्रामुख्याने बचत गट निर्मितीसाठी प्रदिर्घ वेळ गेला. बचत गटाच्या निर्मितीला सुरुवातीला प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे गटांची निर्मिती ही टप्प्याटप्याने होत गेली. बचत गट स्थापन झाल्यापासून 08 ते 12 महिन्याच्या कालावधीतील बचत गटांना पतपुरवठयासाठी (बँक लिंकेजेससाठी) पात्र धरुन त्या गटांना कर्ज पुरवठयाची सुविधा उपलब्ध करुन देण्याचे उद्दिष्ट हाती घेतले आहे. त्या अनुषंगाने सन 2013-14 मध्ये 192 बचत गटांना बँकेमार्फत रु.1.45कोटी उपलब्ध करुन देण्यात आले आहे. यावर्षी सन 2014-15 या आर्थिक वर्षात 1423 बचत गटांना रु.7.28कोटीचे कर्ज उपलब्ध करुन देण्याचे नियोजन हाती घेतले आहे. त्यापैकी सप्टें 2014 अखेरीस ६९६ बचत गटांना 3.7६ कोटी इतका बँकेमार्फत कर्जपुरवठा करुन देण्यात आला आहे. यासाठी बचत, कर्ज व विमा सुरक्षा यावर लक्ष दिले जाते.

**विमा सुरक्षा** - 315 महिलांना विम्याची सेवा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

**मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ** - 41 बचत गटांना 27 लाख व वैयक्तिक 207 महिलांना 31.50लाख असे एकूण रु.58.50लाखाचे अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

**उपजीवीका विकास व बाजारपेठ -**

या घटकाअंतर्गत बचत गटातील महिलांचा आर्थिक विकास घडवून आणणे. त्यांच्या उत्पन्नात वाढ करणे. यासाठी सद्यस्थितीत चालू असलेल्या उदयोग व्यवसायांना चालना देणे व त्यांची गुणवत्ता सुधारणे, नवीन उदयोगांची संधी निर्माण करणे. उदयोग व्यवसाय सुरु करण्यासाठी त्यांना मार्गदर्शन व सहकार्य करणे. त्यांच्या उत्पादित वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध करुन देणे, या बाबींवर भर दिला जातो. खालील रणनीतीच्या आधारे कार्यक्रम राबविला जातो .

- उदयोग विषयक जाणीव जागृती कार्यक्रम (EAP)
- उदयोजकता विकास कार्यक्रम (EDP)
- समान व्यवसाय करणा-यांना एकत्रित करुन संघटित व्यवसाय निर्मिती करणे (MLP)
- महिला उत्पादित वस्तुंची गुणवत्ता व पॅकेजिंग लेबलिंग आणि बाजारपेठ उपलब्धि (Product Development)

- कौशल्य विकास प्रशिक्षण

**उपजीवीका विकास व बाजारपेठ घटकातील साध्य -**

अल्पसंख्या कार्यक्रमामध्ये सन 2012-13 ते 2013-14 या अंमलबजावणीच्या सुरुवातीच्या दोन वर्षामध्ये प्रामुख्याने स्वयंसहाय्यता बचत गटाच्या निर्मितीवर लक्ष्य केंद्रित करण्यात आले होते. बचत गटाची बांधणी सर्वप्रथम करण्यात आली. मुंबई, औरंगाबाद, परभणी या शहरांमध्ये प्रामुख्याने उदयोजकीय विकास जाणीव जागृती (EAP) कार्यक्रम घेण्यात आले. यामध्ये 390 बचत गटातील 4685 प्रशिक्षित केले आहे. तसेच 2760 महिलांना उदयोजकता विकास (EDP) प्रशिक्षण देण्यात आले आहे. जिल्हास्तरावर बचत गटांच्या महिला व त्यांच्या कुटुंबियांना कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमातून 650 लाभार्थींना लाभ देण्यात आला आहे. सद्य स्थितीत २२७४ महिला वैयक्तिक पातळीवर व्यवसाय करीत आहेत.

जिल्हास्तरावर बचत गटातील महिलांच्या वस्तूंचे सणानिमित्त वार्षिक भव्य प्रदर्शन व विक्रीसाठी स्टॉल उपलब्ध करुन देण्यात आले. यामध्ये 300 बचत गटांतील महिलांच्या वस्तूंना स्थानिक जिल्हा स्तरसवर बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच राज्यस्तरीय प्रदर्शनामध्ये सुध्दा अल्पसंख्यांक कार्यक्रमाच्या सन 2012-13 ते 2013-14 या आर्थिक वर्षात सहभाग होता. कनव्हर्जनअंतर्गत जिल्हास्तरावर रोजगार मेळाव्यांमधून अल्पसंख्यांक कार्यक्रमातील महिलांच्या कुटुंबियांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. उदा. कोटक महिंद्रा, ICICI फॉऊंडेशन, जिल्हा रोजगार केंद्र इ.

**महिला आरोग्य व सामाजिक प्रश्नांची जाणीव जागृती -**

अल्पसंख्यांक कार्यक्रमामध्ये अल्पसंख्यांक महिलांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टिने महिलांचे आरोग्य व क्षमता वृध्दीमध्ये वाढ करणे हे उद्दिष्टे लक्षात घेऊन काम करणे आवश्यक आहे. अल्पसंख्यांक घटकातील महिलांचे मागासलेपण रुढी-परंपरा याचा प्रभाव कमी करुन महिला सक्षमीकरणासाठी पोषक वातावरण तयार करण्याची गरज आहे. अल्पसंख्यांक घटकातील महिलांचे आरोग्यविषयक प्रश्न प्रश्न आहेत आणि सामाजिक समस्या यांविषयी त्यांच्यामध्ये जाणीव जागृती करण्यावर भर देण्यात येत आहे. याकरिता आतापर्यंत या घटकाअंतर्गत खालील कार्यक्रम घेण्यात आले आहेत.




**आरोग्य शिबीर माहिती , जनजागृती, मालेमाव,**

- ❖ महिलांचे आरोग्य व स्वच्छता बाबतची जाणीव जागृती करणे.
- ❖ महिलचे शारिरीक श्रम कमी करणे, लिंग समभाव जागृती करणे.

- ❖ अन्न सुरक्षितता व सकस आहारा विषयक जाणी जागृती करणे.
- ❖ कायदेविषयक माहिती व ज्ञान यांची माहिती करून देणे.
- ❖ विविध विभागाच्या योजनांचा कृती संगम घडवून आणणे, युवक संघटन विकसीत करणे व सहभागी करणे ही उद्दिष्टये आहेत.



हिमोग्लोबिन तपासणी कार्यक्रम- कारंजा, वाशीम.



डोळे तपासणी कार्यक्रम – नांदेड.

**महिला आरोग्य व सामाजिक प्रश्नांची जाणीव जागृती घटकातील साध्य**

या घटकाअंतर्गत वस्तीपातळीवर कार्यक्रमासाठी पोषक वातावरण निर्माण करणे. यात महिलांच्या अत्यंत संवेदनशील विषयावरती म्हणजेच आरोग्यावर लक्ष केंद्रित करुन त्यांचे आरोग्यविषयक जाणीव जागृती व तपासणी अशा 39शिबिरांचे आयोजन प्रत्येक कार्यक्षेत्रात करण्यात आले. यातून एकूण दोन वर्षामध्ये 13500 महिला सहभागी होत्या. महिलांसाठी 12 हिमोग्लोबिन तपासणी शिबिरातून 2800 महिलांची तपासणी व उपचाराचा लाभ देण्यात आला आहे.

महिलांना आरोग्यविषयक सुविधेची माहिती देणे व त्यांच्या आरोगयविषयक मदतीसाठी कनव्हर्जनद्वारा " राजीव गांधी -जीवनदायी आरोग्य योजना" चे हेल्थ कार्ड 1703 कुटुंबांना मिळवून देण्यात आले आहे.

भविष्यात सर्व लाभार्थी कुटुंबांना हेल्थ कार्ड मिळवून देण्याचा मानस आहे. महिलांना पेन्शन योजनेची माहिती व लाभ मिळवून देण्याचे अभियान सुरु केले आहे. यात सुरुवातीस **315 महिलांना पेन्शन योजनेत सहभागी** करुन घेण्यात आले आहे. घरकाम करणा-या महिलांना त्यांच्या हक्कांविषयी व त्यांना विविध लाभ मिळवून देण्यासाठी **कामगार कल्याण विभागासोबत कन्हवर्जन करुन 1200 लोकांना लाभ** मिळवून देण्यात आला आहे. जिल्हा विधी प्राधिकरण अंतर्गत कन्हवर्जन करुन अल्पसंख्यांक महिलांना कायदेविषयक माहिती व ज्ञान उपलब्ध करुन देण्याची शिबिरे प्रत्येक जिल्हा स्तरावर किमान दोन घेण्यात आली आहे. यामधून **6500 महिलांना कायदेविषयक माहिती** देण्यात आली आहे.

भविष्यात महाराष्ट्रातील शहरी भागामधील , महानगरपालीका , नगरपालीका व नगरपरिषदांमध्ये स्वयंसाहाय्य बचत गटांच्या माध्यमातून राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान व राज्य नागरी उपजीविका अभियानामध्ये भागीदार संस्था म्हणून माविम २५९ कार्यक्षेत्रात काम कण्यासाठी प्रयत्नशील आहे.

::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::